## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. १७४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०४/०४/२०१८

**१) संगनमत करुन खुल्या जागेत ठेवलेल्या सामानाची चोरी :–**

दिंनाक ०२/०४/२०१८ चे २२.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचे नवीन घराचे समोर खुल्या जागेत १० बॅग अल्ट्राटेक कंपनीचे सिमेंट कि. २,७००/रु . बारा.एमएम.चे ०३ लोखंडी बार कि. १०००/रु, जुन्या पुरान्या आळ जातीचे सेन्द्रींग पाटया व बल्या तसेच बासाच्या बल्या किंमती कि. २०००/रु. असा एकुण ५,७००/रु. चा माल यातील आरोपीतांनी संगनमत करून चोरून नेल्याने फिर्यादी गिरीधर दाजीबा बोरकर वय २७ वर्ष रा. झेंडा चौक सेंदुरवाफा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७९,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परशुरामकर पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**२) पैश्याचे आमीष दाखवुन बॅक खात्या मधुन पैश्याची परतफेड न करता पैश्याची फसवणुक केल्याने गुन्हा नोंद :–**

दिंनाक ०४/०२/२०१८ ते ०३/०४/२०१८ चे वाजता दरम्यान यातील आरोपीने फिर्यादी शामराव रुपचंद गयगये वय ५० वर्ष, रा. खमारी बु. याचे शेतात जिवोचे टावर लावण्यासाठी फिर्यादीचे वडीलाच्या मालकीचे जमीनीचे कागदपत्रे मागुन त्याला विश्वासात घेवुन पैशाचे आमीष दाखवुन वेळोवेळी बॅक खात्या मार्फतीने पैश्याची परतफेड न करता ६२,६००/–रु. ची फसवणुक केल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरून पोस्टे भंडारा येथे अप क्र. ००/१८ कलम ४०६,४२० भादंवि सहकलम ६६(क)माहीती तंत्रज्ञान अधिनीयम २००० चे कागदपत्र पो. स्टे ला प्राप्त झाल्याने पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ४०६,४२० भादवी. सहकलम ६६(क)माहीती तंत्रज्ञान अधिनीयम २००० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. चव्हान पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**३) अज्ञात वाहन धडकेत एक महिला जखमी :–**

दिंनाक ०३/०४/२०१८ चे १६.०० वाजता दरम्यान यातील अज्ञात आरोपी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने, लापरवाहीने व निष्काळजीपणे चालवुन समोरील मोटार सायकलला मिटेवानी ८ किमी उत्तर येथे मागेहुन धडक मारुन मोटार सायकलवर मागे बसलेली सौ. योगनाबाई मारोती गौतम वय ४५ वर्ष, रा. बडपाणी हिला मोठी दुखापत करुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने जखमीचे बयाणा व सरतर्फे फिर्यादी सरोदे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २७९,३३८ भादवी. सहकलम १३४,१८७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**४) दारूच्या नशेत वाहन चालवितांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :–**

दिंनाक ०३/०४/२०१८ चे १२.०० वाजता दरम्यान यातील आरोपी हा त्याचे ताब्यातील बिना नंबरची प्लेट चे वाहण ही दारू पिवुन दारूच्या नशेत भिलेवाडा टी पॉईट येथे चालवितांनी मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशीनद्वारे श्वासाचा नमुना घेतला असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. हटवार वानीशा भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १८५(१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नवखरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**५) महिला मृत अवस्थेत मिळुन आली :–**

दिंनाक ०३/०४/२०१८ चे १६.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी अजय प्रभुदास जगनित वय २४ वर्ष रा. रविदास वार्ड तुमसर याचा मित्र रुपेश मोटघरे याने फोन वरुन माहिती दिल्यावरुन फिर्यादी हा त्याचे वहीने व स्वत:चे राहते घरी जावुन पाहीले असता मृतक सौ. अरुणा मनोज जगनित वय ३८ वर्ष, रा. रविदास वार्ड तुमसर ही घराचे आत मधल्या रुम मध्ये संपुर्णपणे जळुन मृत अवस्थेत जमीनीवर पडलेली मिळुन आल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. शहारे पोलीस स्टेशन तुमसर करीत आहेत.

**६) अवैध दारु अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक ०३/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, करडी, वरठी व तुमसर येथे अवैध हातभट्टी दारू अडड्यावर धाडी घालुन एकुण ४ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ३४ लिटर हातभट्टी दारू किमती ३२००/रु. चा माल जप्त करण्यात आला.

**७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०३/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी – ०४ तीन सिटर वाहनाकरीता ०८ ईतर वाहनांवरती – १०४ केसेस करण्यात आले आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.